# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 09 November 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
## **प्रादेशिक बातम्या**
## **दिनांक – ०९ नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- विधानसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नांदेड आणि अकोल्यात सभा, मराठवाड्याचा पाणी प्रश्न सोडवण्यासाठी वॉटर ग्रीड योजना महायुतीचं सरकारच आणेल असा विश्वास
- भाजप फुटीरतावादी राजकारण करत असल्याचा काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचा आरोप
- मतदानासाठी मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १२ प्रकारचे पुरावे ग्राह्य धरले जाणार
- सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड उद्या अधिकृतपणे निवृत्त होणार, न्यायमूर्ती संजीव खन्ना स्वीकारणार पदभार

आणि

- बीड, हिंगोली तसंच नाशिक इथं गृह मतदानाला सुरुवात

****

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांसाठीच्या प्रचारानं आता वेग घेतला असून, विविध राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या प्रचारसभा आणि पत्रकार परिषद आज राज्यभरात होत आहेत.

****

भाजपचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आज राज्यात अकोला आणि नांदेड इथं सभा झाल्या.

नांदेडमध्ये विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या नऊ मतदार संघातले उमेदवार आणि लोकसभा पोटनिवडणुकीत भाजपा उमेदवारांच्या प्रचारार्थ झालेल्या सभेत

मोदी यांनी, मराठवाडयाचा पाणी प्रश्न सोडवण्यासाठी वॉटर ग्रीड योजना तर विदर्भासाठी नदी जोड योजना महायुती सरकारचं राबवू शकेल, असा विश्वास व्यक्त केला.

अकोला इथं झालेल्या सभेत त्यांनी, एक है तो सुरक्षित है, हा नारा पुन्हा एकदा दिला. महाराष्ट्रानं २०१४ ते २०२४ अशी दहा वर्षं भाजपला सातत्यानं संधी दिली, महाराष्ट्रवासीयांची देशभक्ती, राजकीय समज आणि दूरदृष्टी यातून दिसते, असं ते म्हणाले. राज्य आणि केंद्र सरकार राबवत असलेल्या विविध योजनांची माहिती देऊन मोदी यांनी, महाविकास आघाडी आणि काँग्रेसवर भ्रष्टाचाराचा, घराणेशाहीचा आरोप केला.

****

एक है तो सुरक्षित है आणि कटेंगे तो बटेंगे अशा घोषणा देऊन भाजप फुटीरतावादी राजकारण करत आहे, असा आरोप काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केला. ते आज नागपुरात पत्रकार परिषदेत बोलत होते. नागपूरच्या मिहान मध्ये आलेला एअरबस चा प्रकल्प हा गुजरातला पळवण्यात आला, अशी टीका त्यांनी केली.

तत्पूर्वी, खरगे यांनी नागपुरातल्या दीक्षाभूमीला भेट देऊन, डॉ. आंबेडकर यांच्या मध्यवर्ती स्मारकाला आदरांजली वाहिली. अमरावतीच्या तिवसा इथं काँग्रेस उमेदवार यशोमती ठाकूर यांच्या प्रचारसभेला त्यांनी संबोधित केलं, उत्तर नागपुरात काँग्रेसचे उमेदवार डॉ. नितीन राऊत यांच्या प्राचारार्थ खरगे यांची आज सभा होत आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं औरंगाबाद पूर्व मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार अतुल सावे, औरंगाबाद मध्यचे उमेदवार प्रदीप जैस्वाल यांच्या प्रचारार्थ भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांची सभा शहराच्या बजरंग चौकात होत आहे.

परभणी इथले महायुतीचे शिवसेना उमेदवार आनंद भरोसे आणि जिंतूरच्या भाजप उमेदवार मेघना बोर्डीकर यांच्या प्रचारार्थ परभणी इथं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रचार सभा घेतली. युती सरकार दहा कलमी योजना राबवणार असून, राज्याच्या तिजोरीवर सगळ्यात जास्त अधिकार लाडक्या बहिणींचा, लाडक्या भावांचा आणि शेतकऱ्यांचा असल्याचं ते म्हणाले.

****

नांदेड जिल्ह्यातल्या लोहा, कंधार इथं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी सभा घेतली. महाविकास आघाडीच्या सरकारच्या कालावधीत साडे सहा लाख कोटींचे सामंजस्य करार करून राज्यात उद्योग आणले, मात्र महायुती सरकारनं सर्व उद्योग गुजरातला नेले अशी टीका त्यांनी केली. हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी इथं देखील ठाकरे यांनी जनसभेला संबोधित केलं.
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज बीड इथं परळी विधानसभा मतदारसंघातले महाविकास आगाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ सभा घेतली.
जालना इथं काँग्रेसचे उमेदवार कैलास गोरंट्याल यांच्या प्रचारार्थ पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी प्रचारसभेला संबोधित केलं. त्यानंतर पटोले यांची छत्रपती संभाजीनगर इथं औरंगाबाद पूर्वचे महाविकास आघाडीचे उमेदवार लहु शेवाळे यांच्या प्रचारार्थ सभा झाली.

****

एम आय एम पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी आज औरंगाबाद मध्य आणि पूर्व मतदारसंघात पदयात्रा काढून नागरिकांशी संवाद साधला. हर्सूल परिसरात ओवैसी जनसभेला संबोधित करणार आहेत.

****

सत्याला नेहमीच असत्याशी सामना करावा लागतो, महाराष्ट्राप्रमाणेच हिमाचल प्रदेशनेही ऑपरेशन कमळचा सामना केला पण जनतेने काँग्रेसच्या गॅरंटीवर आणि सरकारच्या कामकाजावर विश्वास ठेवत पुन्हा सत्ता दिली, अशी माहिती हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सुख्खू यांनी दिली. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, आणि कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यावेळी उपस्थित होते. काँग्रेसने कर्नाटक, तेलंगाणा, हिमाचल प्रदेशात जाहीर केलेल्या गॅरंटी दिल्या नाहीत, अशा खोट्या जाहिराती वर्तमानपत्रात देऊन भाजपाने राज्यातल्या जनतेची दिशाभूल केली, असा आरोपही त्यांनी यावेळी केला.

****

नाशिक- चांदवड- देवळा विधानसभा मतदारसंघातले भाजपचे बंडखोर केदा आहेर आणि आत्माराम कुंभार्डे या दोघांची पक्षशिस्तीचा भंग केल्याबद्दल भाजपमधून हकालपट्टी करण्यात आली आहे. यापूर्वी भाजपाने मालेगाव बाह्य मधले बंडखोर

कुणाल सूर्यवंशी, बागलाणमधले आकाश साळुंखे आणि जयश्री गरुड या तिघांची हकलपट्टी केली होती.

****

विधानसभा निवडणूकीसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार असून, मतदान करण्यासाठी, मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य धरले जाणार आहेत. यामध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, बँक पासबुक, आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेलं स्मार्ट कार्ड, पारपत्र, निवृत्तीवेतनाची दस्तावेज, केंद्र अथवा राज्य शासन, तसंच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र आदींचा समावेश असल्याचं निवडणूक आयोगानं कळवलं आहे.

****

राज्यात येत्या २० तारखेला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन अभिनेते विजय गोखले यांनी केलं आहे.

**बाईट – विजय गोखले**

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड उद्या रविवारी अधिकृतपणे निवृत्त होणार आहेत. त्यानंतर न्यायमूर्ती संजीव खन्ना देशाचे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारतील. न्यायमूर्ती चंद्रचूड यांचा काल न्यायालयात शेवटचा दिवस होता. न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी दिलेल्या काही महत्त्वाच्या निकालांमध्ये अयोध्या जमीन वाद, दोन प्रौढांनी सहमतीने ठेवलेल्या समलिंगी संबंधांना मान्यता आणि

अविवाहित महिलांना गर्भपाताचा अधिकार यांचा समावेश आहे. त्यांचे हे निर्णय समाज आणि राजकारणावर दूरगामी परिणाम करणारे होते.

****

देशभरात आज राष्ट्रीय विधी सेवा दिन साजरा केला जात आहे. नागरिकांमध्ये कायदेविषयक जनजागृती व्हावी, आणि समाजातल्या वंचित घटकांसह सर्व नागरिकांना न्याय प्रक्रियेचा लाभ मिळावा, हा यामागचा उद्देश आहे. नागरिकांना त्यांच्या कायदेशीर हक्कांबाबत शिक्षण देण्यासाठी तसंच विविध प्रकल्प आणि योजनांच्या माध्यमातून विवाद निवारण यंत्रणा मजबूत करुन अधिकन्याय्य समाजाची निर्मिती करण्यासाठी दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो.

****

बीड विधानसभा मतदारसंघात आजपासून गृह मतदानाला सुरुवात झाली. ८५ वर्षांवरील, दिव्यांग असलेल्या पात्र मतदारांच्या घरी जाऊन टपाल मतपत्रिकाद्वारे मतदान घेण्यात येत आहे. या मतदारसंघात एकूण ३०७ नागरिक गृह मतदान करणार असून, उद्यापर्यंत हेमतदान चालेल. यासाठी एकूण २२ पथकं नेमण्यात आली आहेत.

हिंगोली विधानसभा मतदारसंघातही गृह मतदान सुरु झालं असून, यासाठी १८ पथकं रवाना करण्यात आली आहेत.

नाशिक विधानसभा मतदारसंघातही गृह मतदान होत असून, आज पहिल्या दिवशी सुमारे शंभराहून अधिक ज्येष्ठ नागरिकांनी मतदान केलं.

****

धुळे जिल्ह्यातल्या साक्री तालुक्यात नवडणे शिवारातल्या एका शेतात धुळे पोलिस दलाच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने गुप्त माहितीवरुन केलेल्या कारवाईत ६७ लाख २० हजार रुपये किमतीचा मद्यसाठा पकडला आहे.

****